# महर्षि वाल्मिकी

(अश्विन पौर्णिमा – तिथीनुसार )

(अल्प परिचय)

आदिकवी; "*रामायणा"चे* कर्ता. वाल्मिकी हे सुमति नावाच्या एका ब्राह्मणाचे पुत्र. त्यांचे आईवडील त्यांना एका किराताजवळ ठेवून तपश्चर्येला निघून गेल्यावर ते ब्राह्मण्य विसरून लूटमार करू लागले. त्यांचे नाव "वाल्या" पडले व सर्व लोक त्यांना "वाल्या कोळी" म्हणू लागले. या "वाल्या" ने एकदा काही ऋषींना घेरले; परंतु त्या ऋषींनी "त्याच्या जीवावर चैन करणारे त्याचे कुटुंबीय त्याच्या पापात वाटेकरी होतात काय ?" असे विचारून येण्यास सांगितले. कोणीही जेव्हा तयार होईना, तेव्हा त्यास उपरती झाली. बसल्या जागी त्याने ऋषींनी दिलेल्या रामनामाचा जप सुरू केला. त्याच्या अंगाभोवती वारूळ (वल्मीक) निर्माण झाले. त्यामुळे त्यास "वाल्मिकी" असे नाव मिळाले, असेही म्हणतात. वाल्मिकी मोठे शिवभक्त होते. *रामायणा*त (बालकांड, २) तमसा तीरावरील वाल्मिकी यांच्या आश्रमाचे वर्णन आहे. वाल्मिकी ऋषींची शिष्यशाखा मोठी होती. भरद्वाज हा त्यांचा प्रमुख शिष्य. रामाने सीतेचा त्याग केल्यावर तिचा व तिच्या पुत्रांचा वाल्मिकीने सांभाळ केला, कुश व लव यांना शिक्षण दिले. भगवान राम यांच्या अश्वमेध यज्ञाला वाल्मिकी सशिष्य उपस्थित होते इ. तपशील "महाभारता"तही आढळतात.

वाल्मिकी ऋषींच्या "*रामायणा*"ने अलंकृत, अभिजात महाकाव्याचा आदर्श निर्मिला. त्यांच्या काव्यप्रतिभेने संस्कृत साहित्य बहरले. आधुनिकांनाही स्फूर्ती मिळाली. "आदिकवी" ह्या गौरवातच वाल्मीकी ऋषींची थोरवी सिद्ध होते. वाल्मीकी ऋषींच्या नावावर *वाल्मिकीसूत्र*, *वाल्मिकीशिक्षा*, *वाल्मिकीहृदय*, *गंगाष्टक* इ. रचना आढळतात.

*****

( स्रोत – सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ)